FORM-1A 0068617 N.C.R.B. I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station A.C.B, पहिली खबर क्र. FIR No. 36, वर्ष Year 2023 दिनांक Date 1.11.2023

2. (i) अधिनियम Act. भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमे Sections कलम 7,
   (ii) अधिनियम Act........................................., कलमे Sections.........................................
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections.........................................

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ............, तारीख पासून Date from 04.10.2023 Time 17:00 तारीख पर्यंत Date to 9/10/2023 Time 18:00 वा.
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 4.10.2023 वेळ Time ............
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 31 तारीख Date 1.11.2023 Time 13.15

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name काळाचौकी पोलीस ठाणे ठिकाणाचे नंबर No. if any ............, गल्ली Ward ............, रस्त्याचे नाव Name of road ............
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ............, गाव Village मुंबई पोस्ट Post ............, तालुका Taluka ............, जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ............, तालुका Taluka ............, जिल्हा Dist. मुंबई राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name स्वप्नील विजय देवरूखकर (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name विजय देवरूखकर
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 54 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9892049517
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............, दिल्याचा दिनांक Date of Issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation सोनारकाम
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste सोनार, जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address : ............, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. 9 फोन / मो. नं. Phone/M-No. ............ पॅन नं. PAN No. ............ वोटर्स नं. Card No. ............
   रस्त्याचे नाव Road पतंगवाला बिल्डींग, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place श्रीखंडे सोसायटी, गाव Village लालबाग, पोस्ट Post परेल, पो. स्टे. P. Stn. ............
   तालुका Taluka ............, जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   ① संतोष जाधव सहा. पोलीस निरीक्षक
   ② राम तुपे पोलीस उप निरीक्षक नेमणूक काळाचौकी पोलीस ठाणे मुंबई.

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

जबाब दि.। /।।/२०२३

श्री.स्वप्नील विजय देवरुखकर वय.३४ वर्षे, धंदा– सोनारकाम (ज्वेलर्स) रा.ठि.– पलंगवाला बिल्डिग, गोखले सोसायटी क्रॉस लेन, परेल, मुंबई ४०००१२ मोबाईल क्र.९८९२०४९५१७

------•------

मी वर नमुद ठिकाणी माझे कुटुंबासह जन्मापासुन राहत आहे. माझे परेल व्हिलेज येथे खडगेश्वर अलंकार ज्वेलर्सचे दुकान आहे. मी अविवाहीत असुन मी आई वडील, दोन भाऊ यांचे सोबत रहात आहे. तसेच मी अन्य वेळात कॉम्प्युटर सर्विस सेलींग चा व्यवसाय करीत असुन त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

मला बहीण नसल्यामुळे माझे परिचयाची सौ. विजया सुरेश देशमुख हिला मी बहीण मानत असुन ती शिवडी येथे पती सुरेश देशमुख व लहान मुलगी राधा यांच्यासह रहात असे. तीच्या अडीअडचणीमध्ये मी तीला व तीचे कुटूबियांना मदत करीत असतो. सौ. विजया देशमुख हिचा लहान भाऊ श्री गणेश प्रदिप सत्रे असून त्याचा सन २०१९ मध्ये गणेश याची पत्नी त्याला सोडून गेल्यामुळे तो बहीण विजया देशमुख यांच्याकडे त्यांच्या कुटुंबियांसोबत राहात होता. गणेश सत्रे हा माझा मित्र आहे. गणेश इंजिनियर असून त्याचा स्वत:चा लॅपटॉप दुरूस्ती, विक्री व सीसीटीव्ही बसवण्याचा व्यवसाय होता.

माझी मानलेली बहीण सौ. विजया देशमुख हिच्याकडे लग्नात मिळालेले व त्यांनी घेतलेले असे एकूण ३१ तोळे सोने व दुकान विक्रीचे ६,००,०००/– रुपये होते ते घरात ठेवले होते. तेव्हा श्री गणेश सत्रे हा बहीण विजया देशमुख हिला म्हणाला की, एवढे सोने व रोख रक्कम घरात ठेवु नकोस माझेकडे बॅंकेचे लॉकर असुन त्यामध्ये मी ठेवतो असे सांगुन दि.३०/१२/२०१९ रोजी गणेश हा विजया देशमुख हिचे कडुन विश्वासाने ३१ तोळे सोने व रोख रक्कम रु. ६,००,०००/– घेवुन गेला. याबाबत विजया हिने मला सांगितले होते. त्यानंतर बहीण विजया देशमुख यांनी सन २०२१ व २०२२ मध्ये सोने व रोख रक्कमेबाबत गणेश याचेजवळ विचारणा केली असता तो या विषयावर बोलण्यास टाळाटाळ करीत असे. गणेशला याबाबत सविस्तर विचारले असता, त्याने सांगितले की, सोने हे सोनार स्वप्नील जानकर सोनाराकडे गहाण ठेवले आहे. म्हणुन बहीण विजया देशमुख हिने सोनार स्वप्नील जानकर यांचेकडे चौकशी केली असता, दोन वर्षापुर्वी गणेश यांने सोने गहाण ठेवले होते त्याबदल्यात त्यास दहा लाख रुपये दिले असल्याचे सोनार स्वप्नील जानकर यांनी सांगितले. ही सर्व घटना विजया देशमुख यांनी मला तसेच त्यांचे पती सुरेश देशमुख यांना सांगितली. त्यानंतर आम्ही विचारविनिमय करून या संदर्भात दि. १८/०७/२०२२ रोजी बहीण सौ. विजया देशमुख यांनी गणेश सत्रे यांचे विरुध्द काळाचौकी पोलीस ठाणे येथे तक्रार अर्ज दिला होता. सदर अर्जाची चौकशी सहाय्यक पोलीस निरीक्षक संताष जाधव यांनी करून काळाचौकी पोलीस ठाणे येथे गु.नो.क्र. ७१/२०२३ कलम ४०६,४२० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास काळाचौकी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री संतोष जाधव यांचेकडे आहे. त्यांनी सदर गुन्हयातील आरोपी गणेश सत्रे यास अटक करण्यासाठी पोलीस उप निरीक्षक श्री राम तुपे यांना सांगितले होते. सदरचा गुन्हा दाखल करताना मी बहीण विजया हिचे सोबत नेहमी जात असल्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव व पोलीस उप निरीक्षक राम तुपे हे माझे मोबाईल फोनद्वारे संपर्क करून प्रत्यक्ष भेटण्यास बोलावून संपर्कात रहात होते. दि.१८/०९/२०२३ रोजी पोलीस उप निरीक्षक राम तुपे हे या गुन्हयाच्या तपासात शिर्डी कोपरगाव, जि. अहमदनगर येथे असताना मला फोन करुन सांगितले की, गणेश सत्रे हा शिर्डी कोपरगाव येथे असुन तु एक गाडी कर व तुझ्यासोबत पोलीस देतो त्यांना घेवुन शिर्डी कोपरगाव येथे ये. त्यावरुन मी माझ्याकडे असलेली वॅगन आर एम एच ०३ बीसी ६६३५ ही गाडी व ड्रायव्हर अमित पाटणकर यास घेवून शिर्डी कोपरगाव येथे पोलीस अंमलदार यांच्या सोबत गेलो. तेथे गेल्यानंतर पोलीस उप निरीक्षक राम तुपे यांनी मला सांगितले की, तु बाजूला थांबून राहा तुला बघितल्यावर गणेश पळून जाईल त्यामुळे मी कोपरगाव पोलीस स्टेशनच्या बाहेर थांबून राहिलो. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक राम तुपे यांनी कोपरगाव येथुन गणेश सत्रे यांस ताब्यात घेतलेनंतर पोलीस उप निरीक्षक राम तुपे यांनी मला एस.टी.ने मुंबईला जाण्यास सांगितले. ते गणेश सत्रे यास घेवून मी घेवून गेलेल्या वॅगन आर गाडीने मुंबईला आले.

त्यानंतर पोलीस उप निरीक्षक राम तुपे यांनी मला काळाचौकी पोलीस ठाणे येथे बोलावुन सांगितले की, गणेश सत्रे यास आम्ही गुन्हयात मध्ये अटक केली असुन माझे व सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव साहेब यांचेकरीता ५०,०००/– रक्कमेची मागणी केली. तेव्हा मी बहीण विजयाशी बोलुन सांगतो असे सांगितले. बहीण विजया हिच्याशी

फिर्यादी श्री.स्वप्नील विजय देवरुखकर यांचा जबाब पुढे चालू

चर्चा करुन मी शिर्डी कोपरगाव येथील खर्च करुन ते अजुन माझेकडे ५०,०००/– रक्कम मागत असल्याचे सांगितले. त्यावेळी बहीण विजया हिने पैसे देण्यास नकार दिला.

त्यानंतर अंदाजे दहा दिवसांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उप निरीक्षक राम तुपे यांनी मला फोन करुन मला काळाचौकी पोलीस ठाणे येथे बोलविले तेव्हा मी काळाचौकी पोलीस ठाणे येथे गेलो असता मला दमदाटी करुन तु जर पैसे दिले नाही तर बहीण विजया हिने दाखल केलेल्या गुन्हयात तुला आरोपी करु असा दम देवु लागले. सदरचा प्रकार बहीण विजया हिला सांगितला. तेव्हा आमचे दोघाचे ठरले की, पोलीस अधिकारी यांना रु. ५०,०००/– दयावयाचे नाहीत. म्हणुन मी व बहीण विजया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात दि. ०४/१०/२०२३ रोजी आलो. माझे कडे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उप निरीक्षक राम तुपे यांनी लाचेची रक्कम मागीतली असल्याने दोन्ही अधिकारी यांचे विरुध्द मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथील अधिकारी यांचेकडे लेखी तकार दिली. तसेच लेखी तकारी सोबत काळाचौकी पोलीस ठाणे येथे नोंद असलेल्या गुन्हयाचे कागदपत्र दिले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांना मी वर नमुद केलेप्रमाणे लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उप निरीक्षक राम तुपे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत व त्यावर कायदेशीर कारवाई करणेबाबत मी सही केलेला माझा स्वहस्ताक्षरातील लेखी तक्रार अर्ज व त्यासोबत काळाचौकी पोलीस ठाणे येथे गु.नो.क्र.७१/२०२३ अन्वये नोंद असलेल्या गुन्हयाचे कागदपत्रांच्या छायांकीत प्रती दिल्या. सदर वेळी पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांनी सपोआ बजरंग चौगुले यांचेशी माझी ओळख करून दिली. परंतु संध्याकाळ झाल्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव व पोलीस उप निरीक्षक राम तुपे हे उदया सकाळी पोलीस ठाणे येथे भेटतील असे सांगुन मी घरी निघून गेलो. त्यानंतर दुस–या दिवशी दि.०५/१०/२०२३ रोजी सकाळी १०:०० वा.ला.प्र.वि., वरळी, मुंबई कार्यालयात आल्यानंतर पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांनी त्यांच्या कार्यालयात उपस्थित असलेले दोन इसम वाडकर आणि सावते हे शासकीय पंच असल्याबाबत ओळख करुन दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक शिंदे यांनी मी केलेल्या अर्जाबाबत पंचांना थोडक्यात हकिकत सांगून मी केलेला तक्रार अर्ज व कागदपत्रांच्या छायांकीत प्रती पंचांना वाचण्यास दिल्या. पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर व कागदपत्रांच्या छायांकीत प्रतीवर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज व कागदपत्रांच्या छायांकीत प्रती असे स्वत:चे ताब्यात ठेवले. त्याचप्रमाणे मी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आज रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर माझे व पंचाचे वक्तव्य झाल्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला सपोनि जाधव व पोउनि तुपे यांच्या भेटी वेळ निश्चित करण्याबाबत विचारणा केली असता, मी त्यांना मोबाईलवर संपर्क करुन पाहु असे सांगितले. त्यावरुन मी माझे मोबाईल क.९८९२०४९५१७ वरुन सपोनि जाधव यांच्या मो.न.८६९८०२२९८० वर कॉल केला. सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आला. तेव्हा सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला सायंकाळी सहा वाजता भेटायला ये असे सांगितले.

त्यावरुन आम्ही सायंकाळी ०४.३५ वाजता मी, पोलीस निरीक्षक पंकज शिंदे, सपोआ बजरंगा चौगुले, एक पोलीस अंमलदार व दोन शासकीय पंच असे शासकिय वाहन क. एम.एच.०४ ए.एन.३६०८ मधुन काळाचौकी पोलीस ठाणेच्या काही अतरावर परळ बी.ई.एस.टी. वसाहत येथील कल्पतरु हॅबिटेड या ठिकाणी रवाना झालो. सदर ठिकाणी पोहोचल्यानंतर पो.नि. पंकज शिंदे व सपोआ चौगुले यांनी मला व पंचास सुचना देवुन माझे शर्टाच्या आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर लावुन काळाचौकी पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव व पोलीस उप निरीक्षक तुपे यांचे भेट घेण्याकरीता पाठविले. मी व पंच श्री वाडकर असे काळाचौकी पोलीस ठाणे येथे गेलो असता ते मिळुन आले नाही. म्हणुन आम्ही परत पोलीस वाहनाजवळ आलो.

समक्ष,

( पंकज शिंदे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Devrukhkar

फिर्यादी श्री.स्वप्नील विजय देवरुखकर यांचा जबाब पुढे चालू 

त्यानतर मी पो.नि. शिंदे यांना सांगितले की, सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांच्या मोबाईलवर कॉल करुन त्यांच्या ठावठिकाण्याबाबत पाहु असे मी सांगितले. त्यावरुन मी माझा मोबाईल क्र.९८९२०४९५१७ वरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांच्या मो.न.८६९८०२२९८० वर कॉल केला. सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आला. तेव्हा सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला सांगितले की ते नवी मुंबई येथे आलो असुन तु उदया सकाळी ११.०० वाजता पोलीस ठाणे येथे भेटण्यास ये. असे सांगितले.

त्यावरुन मी दुस–या दिवशी दि.०६/१०/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा. लाचलुपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात पो.नि.शिंदे यांचे समक्ष हजर झालो. पो.नि. शिंदे यांनी माझे, पंचाचे व स्वत:चे वक्तव्य व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर सपोआ चौगुले यांनी मला व पंचास योग्य त्या सुचना दिल्या. आम्ही सकाळी १०.५० वाजता पोलीस निरीक्षक पंकज शिंदे, सपोआ बजरंगा चौगुले, एक पोलीस अंमलदार व दोन शासकीय पंच असे शासकिय वाहन क्र. एम.एच.०१ ए.एन. १४१२ मधुन तर मी व पंच श्री सावते माझे दुचाकी वरुन काळाचौकी पोलीस ठाणेच्या काही अंतरावर के.ई.हॉस्पीटलच्या पाठीमागे असि.डिन बंगलो या ठिकाणी रवाना झालो. पो.नि. शिंदे माझे शर्टाच्या आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर लावुन काळाचौकी पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव व पोलीस उपनिरीक्षक तुपे यांचे भेट घेण्याकरीता पाठविले. मी व माझे सोबत पंच श्री सावते माझे दुचाकीवरुन काळाचौकी पोलीस ठाणे येथे पोहचलो तेथुन सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांच्या कक्षामध्ये गेलो असता सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांनी त्यानी मला "काय स्वप्नील तुला अटक करावी लागेल"...तेव्हा मी त्यांच्याशी बोलणे करीत असताना **"काय खर्च झाला तो खर्च तरी दयाचा ना...काय तुला बोलायच". "पैसे दे बोलतो.. फक्त खर्च झाले माझे.. दुसर काय काम तुझ्याकडं काय एक्स्ट्रा पैसे मागतोय"** त्यावर सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला तुपे साहेबांना बोलवण्यास सांगितले त्यावर मी माझे मोबाईल वरुन तुपे साहेबांना कॉल करुन बोलवीले. काही वेळात पोलीस उपनिरीक्षक तुपे आले. त्यांच्याशी बोलत असतेवेळी पोलीस उपनिरीक्षक तुपे म्हणाले की **"तू फक्त करून नाय प्रॅटीकल मध्ये प्रोसेस करावी लागणार आहे.... हा म्हणतो म्हणुन"... "असंच आपला येतोय".." फस्ट अमाउट तुला बोलल्लो होतो... तू पण बोलला होता ना.. तूला जे काय आहे त्याच दिवशी क्लिअर सांगितलं होतं... असं नाही की त्या दिवशी तुला क्लिअर संगितलं होत"** तेव्हा मी त्याना चारपाच तासामध्ये करतो असे सांगितले तेव्हा तुपे म्हणाले **" चार पाच तासांत...ठीक आहे"..."बघं स्वप्निल... मला सगळी अमाउंट दयावी लागेल... कमी जास्त वैगरे नकोयं'..** तेव्हा मी किती असे म्हणालो असता त्यांनी त्यांचे मोबाईलवर ५०००० टाईप करुन मला दाखविला तेव्हा मी पन्नास हजार का? त्यावर पोलीस उपनिरीक्षक तुपे यांनी मला इशा–याने बोलु नकोस असा इशारा केला **"कोण बोललं पन्नास हजार"** तेव्हा मी त्याना म्हणालो **"ठीक आहे सर आणतो मी पन्नास हजार...चार तासांत आणतो"** तेव्हा पोउनि तुपे म्हणाले **"हं... ठीक आहं"**. तेव्हा सपोनि जाधव म्हणाले की, **"घेवून यायला... एक चा आकडा सांगायचा का"** तेव्हा मी म्हणालो **"एक लाख... त्यानी संगितले तेवढे घेवुन येवू का"** तेव्हा पोउनि तुपे म्हणाले की **" मी त्याला स्टार्टीगला जे बोललोय ते कर"** तेव्हा मी पन्नास म्हणालो. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक तुपे हे मला कक्षाच्या बाहेर घेवुन आले तेथे पंच श्री सावते देखील माझे मागोमाग आले. जीन्याने खाली उतरत असताना पोउनि तुपे यांनी माझे खादयावर हात टाकुन माझे शरीराची चाचपणी केली. त्यानंतर खाली आल्यावर माझे हातात असलेले हेल्मेट काढुन घेवुन हेल्मेटची देखील तपासणी करुन मला परत दिले. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक तुपे म्हणाले की, **"ठीक आहे सर, बोलतो मी त्याचाशी... साहेब किती बोलले."** तेव्हा मी त्यांना एक बोलल्लो असे सांगितले. त्यानंतर पोलीस स्टेशनच्या बाहेर येत असतेवेळी पोलीस उपनिरीक्षक तुपे हे पंचासोबत काही तरी बोलत असल्याचे मी पाहीले नंतर मी दुचाकी पार्क केलेल्या ठिकाणी येवुन उभा राहीलो. माझे मागोमाग पंच देखील दुचाकी जवळ आले. त्यानंतर मी व पंच श्री सावते पोलीस वाहन थांबलेल्या ठिकाणी दुचाकी वरुन परत येत असतेवेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव व पोलीस उपनिरीक्षक तुपे यांचे माझे मोबाईलवर सतत कॉल येते होते परंतु मी ते स्विकारले नाही. याबाबतची माहिती मी पो.नि. शिंदे यांना पोलीस वाहन थांबलेल्या ठिकाणी आल्यावर दिली.

समक्ष,

( पंकज शिंदे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Devrukhkar

फिर्यादी श्री.स्वप्नील विजय देवरुखकर यांचा जबाब पुढे चालू

त्यानंतर आम्ही सरकारी वाहनामध्ये व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकत असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांचा पुन्हा कॉल आला तेव्हा तो कॉल मी पो.नि. शिंदे यांच्या सांगण्यावरुन स्विकारला तेव्हा सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला साहेबांनी बोलविले असुन तु पाच मिनीटासाठी परत ये असे सांगितले. व फोन बंद केला. त्यानंतर पो.नि श्री शिंदे व सपोआ श्री. चौगुले यांनी शासकीय पंचांसमक्ष माझे, लोकसेवक जाधव व लोकसेवक तुपे यांचेमधील झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डर ऑन करुन ऐकले असता लोकसेवक श्री. संतोष जाधव व लोकसेवक श्री. तुपे यांनी माझ्याकडे रु.५०,०००/– लाच रक्कमेची स्पष्ट मागणी केली असुन सदरची रक्कम चार तासामध्ये घेवुन येण्यास सांगितले असल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर काही वेळाने मी पो.नि. श्री. शिंदे यांना लोकसेवक जाधव व लोकसेवक तुपे यांना फोन करून पाहू असे सांगितले. त्यावेळी पो.नि. शिंदे यांनी सदरचा कॉल ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. मी लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांना कॉल केला त्यावेळी त्यांचा फोन कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर असल्याचे समजले व लोकसेवक पोलीस उप निरीक्षक तुपे यांना कॉल केला असता त्यांनी तो उचलला नाही. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी पुन्हा व्हाईस रेकॉर्डर ऑन केला मी लोकसेवक श्री. तुपे यांचा मो.न. ७०४०६२३२३३ वर मोबाईलचा स्पिकर ऑन करुन कॉल केला. त्यावेळी श्री. तुपे यांनी कॉल स्विकारला. तेव्हा मी तुपे यांना कॉल केला होता का? याबाबत विचारणा केली असता श्री. तुपे यांनी चुकून कॉल लागला असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही ज्या ठिकाणी थांबलो होतो ती जागा बदलून नायगाव परिसरात जावून पोलीस वसाहतीच्या ठिकाणी कोणास संशय येणार नाही अशा ठिकाणी वाहन थाबुंन पुन्हा सपोनि जाधव यांना फोन केला असता, त्यांच्या सोबत संपर्क झाला नाही. त्यामुळे आम्ही लाप्रवि कार्यालयात परत आलो.

सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव व पोलीस उपनिरीक्षक तुपे यांनी मला चार तासात पैसे घेवून येण्यास सांगितले असल्याने मी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांना फोन केला असता, त्यांचा फोन बंद असल्याचे समजले. त्यानंतर पुन्हा पोलीस उपनिरीक्षक राम तुपे यांना मी फोन केला असता, त्यांनी माझा फोन उचलला त्यावेळी त्यांना मी अरेंजमेंट झाली असे बोललो असता त्यांनी कसली रे, कोण बोललयं, केव्हा, त्यावेळी मी त्यांना तुम्हीच तर अरेंजमेंट करायला सांगितले होते असं बालला असता, त्यांनी वेडा झाला काय तू चल ठेव फोन असे बोलून फोन कट केला. त्यानंतर दि. ९/१०/२०२३ रोजी मी सपोनि संतोष जाधव यांना फोन करून आज कधी येवू? असे विचारले असता, त्यांनी वहीणीने दाखल केलेल्या गुन्हयातील आरोपी आल्यावर तुला बोलवतो असे बोलून भेटण्यास टाळाटाळ केली.

दि. ०६/१०/२०२३ रोजी प्रत्यक्ष भेटीदरम्यान झालेल्या चर्चेनंतर लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उपनिरीक्षक राम तुपे यांनी मला केलेले फोन कॉल्स व माझ्यासोबत फोनवर बोलतानाचे त्यांचे वर्तन व बोलण्याचा टोन याच्यावरून लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उप निरीक्षक राम तुपे यांनी माझ्याकडे प्रत्यक्ष भेटीदरम्यान मागणी केलेले ५०,०००/– रूपये ते स्विकारतील याची शक्यता वाटत नाही. यापुर्वी प्रत्यक्ष भेटीदरम्यान झालेल्या संभाषणात माझ्याकडे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उपनिरीक्षक राम तुपे यांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले आहे. म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उपनिरीक्षक राम तुपे दोन्ही काळाचौकी पोलीस ठाणे यांच्याविरूध्द कायदेशीर तकार आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगण्याप्रमाणे लॅपटॉपवर मराठीत टंकलिखीत केली असून, प्रिंटरद्वारे त्याची प्रिंट काढुन ती मला वाचण्यास दिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( पंकज शिंदे ),<br>
पोलीस निरीक्षक,<br>
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

स्वप्निल विजय देवरुखकर

दि. ०६/११/२०२३

## पुरवणी जबाब

श्री.स्वप्नील विजय देवरुखकर वय.३४ वर्षे, धंदा– सोनारकाम (ज्वेलर्स) रा.ठि.– पलंगवाला बिल्डिंग, गोखले सोसायटी क्रॉस लेन, परेल, मुंबई ४०००१२ मोबाईल क्र.९८९२०४९५१७

------•------

मी वर नमुद ठिकाणी माझे कुटुंबासह जन्मापासुन राहत आहे. माझे परेल व्हिलेज येथे खडगेश्वर अलंकार ज्वेलर्सचे दुकान आहे. मी अविवाहीत असुन मी आई वडील, दोन भाऊ यांचे सोबत रहात आहे. तसेच मी अन्य वेळात कॉम्प्युटर सर्विस सेलींग चा व्यवसाय करीत असुन त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

मी समक्ष हजर होवून पुन्हा सांगतो की, मी दिनांक ४/१०/२०२३ रोजी दिलेला तक्रार अर्ज व दि. १/११/२०२३ रोजी दिलेली फिर्याद वाचून पाहिला असता, त्याबाबत माझे अधिकचे सांगणे की, दिनांक १/११/२०२३ रोजी दिलेल्या फिर्यादीमध्ये दिनांक १८/०९/२०२३ रोजी मी, पोलीस अंमलदार रासवे, ड्रायवर अमित पाटणकर असे शिर्डी कोपरगाव येथे गेल्याचे नमूद केले आहे. परंतू सदर दिनांक ही नजरचुकीने टाकली गेली असून दिनांक १६/०९/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० वा. माझ्याकडील वॅगन आर क्र. एम एच ०३ बीसी ६६३५ ही गाडी ,ड्रायव्हर अमित पाटणकर,पोलीस अंमलदार रासवे व मी असे काळाचौकी पोलीस ठाणे येथून शिर्डी कोपरगाव येथे जाण्यासाठी निघालो व दिनांक १७/०९/२०२३ रोजी पहाटे २.०० वा. शिर्डी येथे पोहोचलो. तेथे पोलीस उपनिरीक्षक तुपे भेटले. रात्र झाली असल्याने आम्ही तेथेच हॉटेलमध्ये मुक्काम केला. त्यानंतर सकाळी ०९.०० वा. च्या सुमारास तुपे साहेब मी, पोलीस अंमलदार रासवे व चालक असे गाडी घेवून कोपरगाव तालुका पोलीस ठाणे येथे गेलो. तेथे तुपे साहेब यांनी मला सांगितले की, तु बाजूला थांबून रहा तुला बघितल्यावर गणेश पळून जाईल. त्यामुळे मी कोपरगाव तालुका पोलीस ठाणे परिसरात थांबून राहिलो. त्यानंतर कोपरगाव पोलीस ठाणेचे ०१ पोलीस अंमलदार, तुपे साहेब, पोलीस अंमलदार रासवे व चालक पाटणकर असे गाडी घेवून कोपरगाव तालुक्यातील रवंदा या गावी गेले. तेथे गणेश सत्रे याचा शोध घेतला तो मिळून न आल्याने ते पुन्हा कोपरगाव तालुका पोलीस ठाणे येथे आले. तेथून तुपे साहेब यांनी इतर व्यक्तींना संपर्क करून गणेश सत्रे यास पोलीस ठाणेस बोलावून घेतले. त्यानंतर तुपे साहेब यांनी मला बसने मुंबईला येण्यास सांगितले. तुपे साहेब, आरोपी गणेश सत्रे चालक पाटणकर व पोलीस अंमलदार रासवे असे माझ्या गाडीने मुंबईला आले. मला बसने येण्यास सांगितल्याने मी बसने दि. १८/०९/२०२३ रोजी पहाटे घरी पोहोचलो. आम्ही शिर्डी येथे जात असताना जेवणाचा, राहण्याचा व कोपरगाव येथे जाण्याचा व येण्याचा खर्च हा मी केला होता.

त्यानंतर दुपारी आमच्या सोबत शिर्डी कोपरगाव येथे आलेला चालक अमित पाटणकर हा मला भेटला व तुपे साहेबांनी आरोपी अटक केल्याने ५०,०००/– रूपये त्यांना देण्याबाबतचा निरोप मला सांगितला. त्यामुळे मी तुपे साहेब यांना भेटण्यासाठी मी काळाचौकी पोलीस ठाणे येथे गेलो असता, तुपे साहेब यांनी आरोपी अटक केल्यामुळे त्यांचे व सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्यासाठी माझ्याकडे ५०,०००/– रूपयांची मागणी केली. त्यामुळे मी सर्व घटना बहीण विजया देशमुख यांना सांगितली.

माझा वरील पुरवणी जबाब हा माझे सांगण्याप्रमाणे लॅपटॉपवर मराठीत टंकलिखीत केला असून, प्रिंटरद्वारे त्याची प्रिंट काढुन तो मला वाचण्यास दिला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

Devrukhkar

समक्ष,

( पंकज शिंदे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..............................
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
..............................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

सातील फि। याची मानलेली बहिण विजया देवमुख यांनी काळाचौकी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७/2023 कलम 406, 420 भा.द.वि. प्रमाणे गणेश ... यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. फि।हा व फिर्यादी ... काळाचौकी पोलीस ठाणे येथे नेहमी जात असत. यातील आरोपी मजकूर । व २ यांनी फिर्यादीस बहिणीने दाखल केलेल्या गुन्हात ... अटक केली म्हणून 50,000/- रुपयांची मागणी केली म्हणून आरोपीतांवर भ्र.प्र. अधि. 1988 चे कलम 7 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
पोलीस निरीक्षक पंकज शिंदे ला.प्र.वि. मुंबई.
2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
..............................................................................................
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..............., जिल्हा ..............., राज्य ...............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No............... to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................
District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.) [signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name .. पंकज नामदेव शिंदे
पदनाम Rank....... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..........
Posting ला. प्र. वि मुंबई.
Code No. of I. O. ..............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख.. 1/11/2023
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

① प्रत मिळाली. [signature]
② [signature] ...

प्रत मिळाली
[signature]

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ....................

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ....................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ....................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फि।। याची मानलेली बहिण विजया देशमुख यांनी काळाचौकी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७१/2023 कलम 406, 420 भा.द.वि. प्रमाणे ज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. फि।।चा बहिणीचे सदर काळाचौकी पोलीस ठाणे येथे नोंद असल यातील आरोपी मजकूर 1 व 2 यांनी फिर्यादीच्या बहिणीने दाखल केलेल्या गुन्हात [illegible] अटक केले म्हणून 50,000/- रुपयांची मागणी केली म्हणून आरोपीतांवर भ्र.प्र. अधि. 1988 चे कलम 7 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक पंकज शिंदे ला.प्र.वि. मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ....................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...................., जिल्हा ...................., राज्य ....................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).................. Rank.............. No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................
District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.) [signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... पंकज नामदेव शिंदे
पदनाम Rank....... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ....
Posting ला.प्र.वि. मुंबई.
Code No. of I. O. ....................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख... 1/11/2023
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

प्रत मिळाली [signature]

① पंचनामा. [signature]

② [signature] — [illegible]